K–44

FMT–01

Total No. of Questions : 9] [Total No. of Printed Pages : 4

**BDP/BCA/BTS**

**सत्रांत परीक्षा**

**जून, 2014**

**FMT–01 : मराठी भाषेचा अधिष्ठान, अभ्यासक्रम**

**Time : 2 Hours]** **[Maximum Marks : 50**

**नोट :–** सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

1. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : 10
   (a) पाणी म्हणजे जीवन
   (b) माझा आवडता लेखक
   (c) पर्यावरणाचे रक्षण
   (d) स्त्री-पुरुष समानता

2. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : 8
   (a) संतांचा अवतार कशासाठी असतो असे तुकाराम सांगतात ?
   (b) कवी अलौकिक सृष्टीचा निर्माता आहे, असे केशवसुत का म्हणतात ?
   (c) मर्ढेकरांनी 'नव्या मनूतिल गिरिधर पुतळा' असे कोणाला म्हटले आहे ? का ?
   (d) आक्काला कातरवेळी अविनाशची आठवण का होते ?

3. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : 6
   (a) 'वळीव' पडल्यामुळे कोणता फायदा झाला ?

(b) चेलम्याच्या प्रसंगात पाटलाच्या माणसाची कोणती कृती अस्पृश्यतेवर दाहक टीका करणारी होती ?

(c) आकाश आणि कृष्ण यांच्यात शिखाडकरांना कोणते साम्य आढळले ? का ?

(d) मुरलीमाय आणि कुंजा यांच्यातील विरोधी मूल्यांचा संघर्ष कोणता ?

4. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर टीपा लिहा : 6

(a) 'गुंडयाभारुचे दुखणे' या कथेतील प्रसंगनिष्ठ विनोद

(b) ललित वाङ्मयाची वैशिष्टये

(c) भाषांतर म्हणजे पुनर्निर्मिती

(d) उत्तम पत्रव्यवहाराची वैशिष्टये.

5. नाम. सर्वनाम, विशेषण, क्रियापद, आणि क्रियाविशेषण यांचे प्रत्येकी एक-एक उदाहरण देऊन, त्यांचा वाक्यात उपयोग करा.

**किंवा**

खालीलपैकी **एका** कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा : 5

(a) जनसेवा हीच ईश्वरसेवा

(b) यत्न तो देव जाणावा

(c) सत्यापरता धर्म नाही

6. खालीलपैकी कोणत्याही **तीन** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा— 3

(a) मूग गिळणे

(b) बाजीरावाचा बेटा

(c) रामराज्य

(d) नाकी नऊ येणे

(e) मनात मांडे खाणे

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही **तीन** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा–

(1) ऐकावे जनाचे करावे मनाचे

(2) गरज सरो वैद्य मरो

(3) खाईन तर तुपाशी, नाही तर उपाशी

(4) वासरात लंगडी गाय शहाणी

(5) चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे.

7. खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा :– 4

(1) डॉ. आंबेडकरांच्या मते लोकशाही रक्षणासाठी आपल्यावरील जबाबदा या कोणत्या ?

(2) स्त्री-विषयक पारंपरिक व आधुनिक दृष्टिकोन कोणते ?

(3) गणकयंत्राचे फायदे आणि तोटे कोणते ?

(4) पक्षी पर्यावरणातील समतोल राखण्यास कशी मदत करतात ?

8. खलील उता याचे मराठीत भाषांतर करा : 4

Darwin is generally credited with the theory that men are descended from monkeys. As a matter of fact, he never said anything of the sort. He believed that man and apes are both evolved from a common prehistoric ancestor that is now extinct. The ape, in other words, is not our forefather but our distant cousin.

9. खलील उता याचा सारांश लिहा :– 4

जगातले अनेक देश एका नव्या युगाचा आरंभ करण्यात मग्न आहेत. हे युग संशोधन, ज्ञान व शाश्वत मूल्यं यावर आधारित असेल. हे आज अमेरिका, स्वीडन, जर्मनी,

सिंगापूर, चीन, स्वित्झर्लंड या देशांच्या नेत्यांनी हेरलं आहे, तिथले खासदार, विचारवंत व प्रसारमाध्यमांतलया अनेकांना याची जाणीव झालेली आहे. हे सर्वजण त्यात गुंतले आहेत, शास्त्रज्ञांचं संशोधन हा केवळ एक भाग झाला, पण हे यश दूरदर्शी राजनेते, निष्णात विचारवंत, जबाबदार उद्योगपती व मुख्यत: तत्त्ववेत्ते यांचं आहे. भारतात सक्षम व उच्च दर्जाचे वैज्ञानिक आहेत; पण राजकारणी, विचारवंत व इतरांचं काय ? की आपण जुन्या युगात राहूनच महासत्ता होण्याच्या वल्गना करणार ?